सूचना का अधिकार

# ठाणे अतिरीक्त जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच

रु.नं..428 / 429, कोकण भवन इमारत, चौथा मजला, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई-400 614

दूरध्वनी क्र.022-27575480 E-mail : confo-th1-mh@nic.in Website : https://grahak.maharashtra.gov.in/

जा.क्र.ठाअजिग्रातनिमं/आस्था/सूचना/2015/ १०२५ दिनांक 8 जुलै, 2015

## -ः सूचना ः-

ग्राहक संरक्षण विनियम, 2005 च्या विनियम 20 मधील तरतुदीस अनुसरुन मा.अध्यक्षा, ठाणे अतिरीक्त जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच यांचे पूर्वमान्यतेने याद्वारे खालील सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

१. ग्राहक संरक्षण विनियम, 2005 च्या विनियम क्र.20 मधील तरतुदीनुसार मंचाद्वारे तक्रार प्रकरण निकाली काढणेत आलेनंतर सदरच्या तक्रारीच्या अतिरीक्त संचिका सदरील तक्रारीतील तक्रारदार व विरुध्द पक्षकार यांनी तक्रार निकाली काढल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आंत घेऊन जाव्यात.

२. वरील कालावधीत सदरील संचिका संबंधित पक्षकारांनी घेऊन न गेल्यास वरील विनियमातील तरतुदीनुसार त्या संचिका मंचाद्वारे निर्लेखित करण्यात येतील. तदनंतर सदरच्या तक्रारीतील पक्षकारांनी सदरील अतिरीक्त संचिका मिळणेबाबत विनंती केल्यास त्याचा विचार केला जाणार नाही.

तरी या सूचनेची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

आदेशान्वये,

(अजय प्र.ब्राम्हणकर)

प्रभारी प्रबंधक,

ठाणे अतिरीक्त जिल्हा मंच, नवी मुंबई

D:\THANE ADDL\Working.docx